॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

✻ सुविचार ✻
संपत्तीचा अभाव हे सर्व वाईट गोष्टींचे मूळ आहे.

■ अहिल्यानगर ■ शुक्रवार, दि. १० एप्रिल २०२६ ■ वर्ष ६ वे ■ अंक ३२५ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

## SPOT NEWS

### महिला आरक्षण विधेयकाला विशेष अधिवेशनात मंजुरी?

● **नवी दिल्ली** – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत नारी शक्ती वंदन कायद्यात सुधारणा करणा-या विधेयकाच्या मसुद्याला काल मंजुरी देण्यात आली. या प्रस्तावानुसार लोकसभेच्या जागांची संख्या सध्याच्या ५४३ वरून ८१६ पर्यंत वाढेल, ज्यापैकी २७३ जागा महिलांसाठी राखीव असतील. त्यातच आता सरकारने अर्थसंकल्पीय अधिवेशन वाढवले असून १६ ते १८ एप्रिलदरम्यान विशेष अधिवेशन बोलावले आहे. या विशेष अधिवेशनात महिला आरक्षण सुधारणा विधेयक मंजूर होण्याची शक्यता आहे. संसदेच्या विशेष अधिवेशनात महिला आरक्षण सुधारणा विधेयकाला मंजुरी मिळू शकते. त्यानंतर हा कायदा ३१ मार्च २०२९ रोजी लागू होईल. तो प्रथम त्या वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुका आणि काही राज्यांमधील विधानसभा निवडणुकांमध्ये प्रभावी होईल. प्रस्तावानुसार आरक्षण उभ्या तत्त्वावर लागू केले जाईल, म्हणजेच अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी राखीव असलेल्या जागांमध्येही महिलांचा वाटा निश्चित केला जाणार आहे. राज्य विधानसभेतील जागाही त्याच प्रमाणात राखीव ठेवल्या जातील.

### प्रतिभा चाकणकरांची चौकशी होणार

● **शिर्डी** – नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरातला एसआयटीने आज पुन्हा एकदा न्यायालयात हजर केले होते. यावेळी न्यायालयाने अशोक खरातला आणखी ५ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. त्यामुळे खरातचा पोलिसांच्या तावडीतील मुक्काम आणखी वाढला आहे. खरातवर एकूण १२ गुन्हे दाखल असून एसआयटीने न्यायालयातून आज लगेचच तिसऱ्या गुन्ह्यात त्याचा ताबा घेतला. दरम्यान, या खरात प्रकरणात रुपाली चाकणकर यांच्या भगिनी प्रतिभा चाकणकर यांची चौकशी होण्याची शक्यता आहे. शिर्डी पोलिस त्यांना नोटीस पाठविणार असल्याचे समजते. सरकारवाडा पोलिस ठाण्यात दाखल असलेला हा तिसरा गुन्हा अत्यंत गंभीर असून, एका ७ महिन्यांच्या गरोदर महिलेवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप खरातवर आहे.

# राहुरी पोटनिवडणूक बिनविरोध नाहीच

## अक्षय कर्डिले, गोविंद मोकाटे यांचेसह सात जण रिंगणात । २३ रोजी होणार मतदान

● **राहुरी । वीरभूमी** – राहुरी विधानसभा पोटनिवडणुक बिनविरोधसाठी भाजपाने मोठे प्रयत्न केले मात्र राष्ट्रवादी शरद पवार पक्ष व वंचितसह अपक्षांनी आपले उमेदवारी अर्ज कायम ठेवल्याने अखेर राहुरी निवडणूक बिनविरोध झालीच नाही. आज ९ एप्रिल या अर्ज माघारीच्या अखेरच्या दिवशी ८ अपक्ष उमेदवारांनी माघार घेतल्याने भाजपाचे अक्षय शिवाजीराव कर्डिले, महाविकास आघाडीकडुन शरद पवार गटाचे गोविंद मोकाटे, वंचित बहुजन आघाडीकडुन संतोष चोळके व चार अपक्ष असे सात जण निवडणुकीच्या रिंगणात आपले नशीब ıजमावत आहेत.

वरील तीन पक्षांसह या निवडणुकीत अपक्ष उमेदवार म्हणून प्रहार संघटनेचे सुरेश लांबे, उबाठा शिवसेनेचे रावसाहेब खेवरे, महेश हापसे, अर्थव म्हसे हे अपक्ष म्हणुन नशीब अजमावत आहेत. आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळे राहुरी विधानसभा मतदारसंघाची २३ एप्रिल रोजी मतदान होत आहे.




विधानसभा निवडणुकीत ३० जणांनी ४२ अर्ज दाखल केले होते. उमेदवारी अर्ज माघारीच्या अखेरच्या दिवशी बाळासाहेब जाधव, नागेश जाधव, अनिल जाधव, नामदेव पवार, सविता शेटे, संभाजी धोंडे, साहेबराव म्हसे, रविंद्र मोरे या आठ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले.

उमेदवारी अर्ज माघारीचा आज अखेरचा दिवस असल्याने काही अपक्ष उमेदवार नॉटरिचेबल झाले होते. वंचित बहुजन आघाडीकडुन संतोष चोळके हे निवडणूकीला सामोरे जातील अशी माहिती प्रकाश आंबेडकर यांनी राहुरी येथे प्रसार माध्यमाशी बोलताना दिली.

सुरुवातीला ही निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता वर्तवली जात होती. कारण राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी अचानक माघार घेतली होती. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी तनपुरेंची भेट घेतल्यानंतर त्यांनी ६ एप्रिल रोजी उमेदवारी अर्ज न भरण्याचा निर्णय घेतला. या घडामोडीनंतर राजकीय वर्तुळात ही निवडणूक बिनविरोध होणार, अशी चर्चा रंगली होती. मात्र, शेवटच्या टप्प्यात राजकारणाला अनपेक्षित वळण मिळालं. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने मास्टरस्ट्रोक खेळत गोविंद मोकाटे यांना उमेदवारी जाहीर केली आणि निवडणुकीत ट्विस्ट आला. त्यामुळे भाजपसमोर थेट लढत उभी राहिली आहे. त्यातच वंचित बहुजन आघाडीनेही संतोष चोळके यांना उमेदवारी देत निवडणूक लढवण्याचा निर्णय कायम ठेवला. त्यामुळे तिसरा महत्त्वाचा पर्याय मतदारांसमोर उभा राहिला आहे.

अपक्ष उमेदवारांनीही मोठ्या संख्येने अर्ज दाखल केल्याने मतांचे विभाजन होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. एकूणच, बिनविरोध होण्याच्या उंबरठ्यावर असलेली राहुरी पोटनिवडणूक आता बहुरंगी आणि चुरशीची होणार आहे. भाजपचे अक्षय कर्डिले यांच्यासमोर आता केवळ औपचारिक लढत नसून, राष्ट्रवादी आणि वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांमुळे खरी कसोटी लागणार आहे.

## बारामती पोटनिवडणुकीतून काँग्रेसची माघार

● **मुंबई । वीरभूमी** – राज्याचे लक्ष लागलेल्या बारामती विधानसभा पोटनिवडणुकीतून काँग्रेसने अखेर माघार घेतली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासमोर काँग्रेसने आकाश मोरे यांना उमेदवारी दिली होती. परंतु आज आकाश मोरे यांची उमेदवारी मागे घेण्यात आली आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पत्रकार परिषद घेऊन बारामतीच्या पोटनिवडणुकीतून माघार घेत असल्याचं जाहीर केले. पोटनिवडणुकीतील उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस होता. त्यामुळे आज सकाळपासून राज्यात राजकीय विविध घडामोडी आणि ट्विस्ट पाहायला मिळाले.

हर्षवर्धन सपकाळ पत्रकार परिषदेत म्हणाले की, दोन पोटनिवडणूक महाराष्ट्रात होणार आहे. यामध्ये बारामतीकडे सर्वात जास्त लक्ष लागले आहे. वैचारिक भूमिका म्हणून भाजपला विरोध करण्यासाठी बारामतीच्या पोटनिवडणूकीत अर्ज भरला होता. बारामती नाही तर देशभरात भाजपच्या विरोधात काँग्रेसने भूमिका घेतली होती. एकूण सहा अर्ज बारामतीसाठी आले होते. परंतु शरद पवार गटाचे आमदार रोहित पवारांनी भल्या पहाटे येऊन बारामतीची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी विनंती केली.

अजित पवार यांच्या संदर्भात सहकार्याची भूमिका घ्या अशी विनंती केली. काही जणांनी अपरिपक्व वक्तव्य केली. त्या संदर्भात कुटुंबांनी दिलगिरी व्यक्त केली. शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांनी ही विनंती आणि सूचना दिल्या, अशी माहिती हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली. यानंतर सर्व काँग्रेस नेतृत्व यांच्यासोबत चर्चा केली. लढले पाहिजे ही आमची भूमिका आहे. मात्र संस्कृती आणि संवेदना म्हणून आम्ही बारामतीच्या पोटनिवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेत आहोत, असं हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले.

बारामतीच्या निवडणुकीतून माघार घ्या, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा मला फोन आला होता. परंतु देवेंद्र फडणवीस यांचा फोन येण्याचा आणि निर्णय घेण्याचा काहीही संबंध नाही. देवेंद्र फडणवीसांनी संस्कृती हा शब्द वापरला. तसेच माघार घेण्यासाठी अनेकांनी कळकळीची विनंतीही केली, अशी माहिती हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी २०२६ रोजी निधन झाले. त्यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणुक होत असून मतदान २३ एप्रिल रोजी होत आहे.

## तहसीलदार राकेश गिड्डे यांचे अपघाती निधन

● **बीड । वीरभूमी** – बीडमध्ये पुन्हा भीषण अपघात झाला आहे. लातूर-अंबाजोगाई महामार्गावरच्या नेहरूनगर कॉर्नरवर भीषण अपघात झाला आहे. या अपघातात बीडच्या केज येथे कार्यरत असलेले तहसीलदाराचा जागीच मृत्यू झाला आहे. तहसीलदाराच्या मृत्यूने प्रशासकीय कर्मचाऱ्यांवर शोककळा पसरली आहे.



बीडमधील केज तालुक्याचे तहसीलदार राकेश गिड्डे यांचा आज बुधवारी (९ एप्रिल) सकाळी लातूर-अंबाजोगाई महामार्गावरील रेणापूर फाट्याजवळ भीषण कार अपघातात झाला. या कार अपघातात गिड्डे यांचा मृत्यू झालाय. राकेश गिड्डे हे स्वत:च्या कारने प्रवास करत होते, त्यावेळी त्यांच्या वाहनाचा अपघात झाला.

प्राथमिक माहितीनुसार, ते कारमध्ये एकटेच होते. अचानक वेग वाढल्याने नियंत्रण गमावून त्यांची कार उलटली, असा अंदाज रेणापूर पोलिसांनी वर्तवला आहे. या अपघाताची तीव्रता इतकी होती की, या घटनेत त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी तातडीने धाव घेतली.

पोलिसांनी त्यांचा मृतदेह पोस्टमार्टमसाठी रेणापूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केला. एक कार्यक्षम आणि तरुण अधिकाऱ्याच्या अशा अचानक जाण्याने महसूल प्रशासनासह संपूर्ण केज तालुक्यावर मोठी शोककळा पसरली आहे. पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहे.

तत्पूर्वी, बीडच्या अंबाजोगाई शहरातील रिंग रोडवर बुधवारी भीषण अपघात झाला. या अपघातात बँक अधिकाऱ्याचा जागीच मृत्यू झाला. भरधाव ट्रकने त्यांच्या दुचाकीला धडक दिल्याने त्यांचा मृत्यू झाला.

काल बँक अधिकारी आणि आज तहसीलदाराचा अपघाती मृत्यू झाल्याने बीडमधील रस्ते वाहतुकीच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# गहिनीनाथ गडाच्या विकासासाठी कटिबद्ध

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस । लाखो भाविकांच्या उपस्थितीत नारळी सप्ताह भक्तिमय वातावरणात संपन्न

● **बीड । वीरभूमी** – म्हसोबावाडी (ता. आष्टी, जि. बीड) येथे पार पडलेल्या श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाच्या ९४ व्या नारळी सप्ताहाच्या समारोप प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत भावनिक शब्दांत आपली भूमिका मांडली, मी येथे मुख्यमंत्री म्हणून नाही, तर गहिनीनाथ महाराजांचा अनुयायी म्हणून नतमस्तक होण्यासाठी आलो आहे. गडाच्या विकासासाठी रस्ता असो वा अन्य कोणताही प्रश्न, तो सोडविण्यास मी कटिबद्ध आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

संत वामनभाऊ महाराज यांनी सुरू केलेल्या या परंपरेचा समारोप गुरुवारी (दि. ९) काल्याच्या कीर्तनाने झाला. यावेळी गहिनीनाथ गडाचे विठ्ठल महाराज, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, आमदार सुरेश धस, आमदार धनंजय मुंडे, माजी आमदार भीमराव धोंडे, माजी आमदार साहेबराव दरेकर, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, बाळासाहेब आजबे, प्रताप ढाकणे, सरपंच शिवा शेकडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, संत वामनभाऊ यांनी केलेले कार्य अविस्मरणीय आहे. नाथ संप्रदायात गहिनीनाथांचे महात्म्य मोठे असून, या गडावर प्रत्येक काम अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडते, हे मी प्रत्यक्ष अनुभवले आहे. विशेष म्हणजे, या नारळी सप्ताहाचे नियोजन २०३९ पर्यंत निश्चित झाले आहेत यातच या भक्तीकार्याचे यश दिसते .समाजाला एकत्र आणण्याचे हे काम अतिशय मोलाचे असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, गहिनीनाथ गडाचा नारळी सप्ताह कायमस्वरूपी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या यजमानपदाखाली व्हावा व त्यांनी गडाचे पालकत्व घ्यावे, दिवंगत गोपीनाथ मुंडे यांच्या कार्याच्या आठवणींना उजाळा देत, त्यांच्या विचारांवर आपण काम करत असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, आमदार सुरेश धस यांनी नगर-बीड महामार्गाच्या कामासाठी भरीव निधीची मागणी करत, या रस्त्यावर होणारे अपघात रोखण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. नारळी सप्ताह कार्यक्रमास भाविकांची मोठी गर्दी झाली होती.



## SPOT NEWS

### एआयओसीडी कडून ९३ व्या डीटीएबी बैठकीच्या अजेंडावर एकत्रित निवेदन सादर

● **अहिल्यानगर । वीरभूमी-**
द ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट्स ॲण्ड ड्रगिस्ट्स (एआयओसीडी) यांनी १६ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या ९३व्या ड्रग टेक्निकल ॲडव्हायझरी बोर्ड (डीटीएबी) बैठकीतील महत्त्वाच्या अजेंडा मुद्द्यांवर (२, ५, ७, ९ आणि १२) सविस्तर निवेदन सादर केले असल्याची माहिती केमिस्ट्स असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष दत्ता गाडळकर व सचिव आबासाहेब बेद्रे यांनी दिली.एआयओसीडीचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे आणि महासचिव राजीव सिंगल यांनी संयुक्तरित्या सादर केलेल्या निवेदनात सार्वजनिक आरोग्य, औषधांचा योग्य व विवेकी वापर आणि नियमनबद्ध औषध वितरण प्रणालीच्या संरक्षणासाठी संघटनेची कटिबद्धता अधोरेखित करण्यात आली आहे. तसेच बेकायदेशीर व अनियंत्रित फार्मसीच्या वाढत्या प्रमाणाबाबत गंभीर चिंता व्यक्त करत, यामुळे रुग्णांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. महत्त्वाच्या प्रस्तावांवर संघटनेने भूमिका मांडली आहे. यामध्ये गुड डिस्ट्रिब्युशन प्रॅक्टिसेस (जीडीपी): एआयओसीडीने या प्रस्तावाचे स्वागत केले असले, तरी तो टप्प्याटप्प्याने आणि व्यवहार्य पद्धतीने लागू करण्याची मागणी केली आहे. लहान व मध्यम औषध विक्रेत्यांवर कोणताही अतिरिक्त आर्थिक किंवा प्रशासकीय भार पडू नये, यावर संघटनेने विशेष भर दिला आहे.

# निघोज येथील मळगंगा देवी यात्रा उत्सवाची तयारी पूर्ण

## १० एप्रिलपासून यात्रेला सुरुवात । पाच दिवसांत पाच लाखांहून अधिक भाविक हजेरी लावण्याचा अंदाज

● **निघोज । वीरभूमी -**
राज्यातील जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीच्या यात्रा उत्सवाची तयारी पूर्ण झाली असून मुख्य यात्रेला शुक्रवार दि. १० एप्रिलपासून सुरुवात होत आहे. मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट, मळगंगा यात्रा उत्सव समिती, निघोज ग्रुप ग्रामपंचायत, ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने हा उत्सव दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.

शुक्रवार दि. १० रोजी पहाटे महाअभिषेक पूजा व महाआरती होणार असून त्यानंतर देवीदर्शनास सुरुवात होईल. यात्रेदरम्यान पाच दिवसांत किमान पाच लाखांहून अधिक भाविक उपस्थित राहतात. भाविकांना सुरळीत दर्शन मिळावे यासाठी मळगंगा ट्रस्टकडून विशेष दर्शन व्यवस्था करण्यात आली आहे.

याच दिवशी दुपारी ४ ते ६ वाजेपर्यंत बगाडगाडा मिरवणूक, सायंकाळी ६ ते ७ वाजेपर्यंत देवीला अंबील वर्तविण्याचा कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून सायंकाळी ७ ते ९ या वेळेत सुमारे एक लाख भाविक महाप्रसादाचा लाभ घेतात.



रात्री ८ ते मध्यरात्री २ वाजेपर्यंत देवीच्या काठ्या व पालखीची भव्य मिरवणूक काढण्यात येते. गावोगावच्या पालख्या व काठ्या मोठ्या संख्येने सहभागी होत असतात. या मिरवणुकीत लेझीम पथके, ढोल-ताशा पथके सहभागी होत वातावरण भक्तिमय करतात. या मिरवणुकीत सुमारे दोन लाख भाविक सहभागी होतात.

मध्यरात्री उशिरा देवीच्या हेमाडपंथी बारवेत श्रींचे घागर दर्शन होणार असून देवीच्या मानकऱ्यांच्या हस्ते घागरीची पूजा-अर्चा केली जाते.

शनिवार दि. ११ रोजी सकाळी ७ ते १० वाजेपर्यंत घागरीची सवाद्य मिरवणूक काढण्यात येते. या मिरवणुकीसाठी व घागर दर्शनासाठी राज्यभरातून सुमारे चार लाख भाविक उपस्थित राहतात. त्यानंतर दुपारी ४ वाजता छबिण्याची मिरवणूक कुंडावर जाते आणि त्याचवेळी कुंडाची यात्रा सुरू होते. ही यात्रा दोन दिवस चालते.

यात्रेनिमित्त मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, एस.टी. बसेसची सोय तसेच ग्रामस्वच्छता व आरोग्यविषयक सुविधा



उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट, मळगंगा यात्रा उत्सव समिती, निघोज ग्रुप ग्रामपंचायत, ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ यांनी एकत्रितपणे यात्रेची सर्व तयारी पूर्ण केली आहे.

# पाथर्डी आगाराला १० नवीन एसटी गाड्यांचा दिलासा; आमदार शिवाजीराव गर्जे यांच्या पाठपुराव्याला यश

● **पाथर्डी । वीरभूमी-**
प्रवाशांच्या वाढत्या संख्येच्या पार्श्वभूमीवर नव्या बस गाड्यांची तातडीची गरज लक्षात घेऊन आमदार शिवाजीराव गर्जे यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेऊन मागणी केली होती. त्यानुसार पाथर्डी आगाराला १० नवीन एसटी गाड्या उपलब्ध करून देण्याचा आदेश परिवहन मंत्र्यांनी एसटीच्या मध्यवर्ती कार्यालयास दिला आहे. या निर्णयाचे प्रवासी संघटनांकडून स्वागत करण्यात आले आहे.

उन्हाळी सुट्ट्या, धार्मिक पर्यटन, धोंड्याचा महिना व लग्नसराईचा हंगाम यामुळे प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. नगर-पाथर्डी-नगर या मार्गावर जलद व तत्पर सेवा देण्यासाठी बस गाड्यांची टंचाई निर्माण झाली होती. त्यामुळे उत्पन्नात घट होऊन प्रवाशांमध्ये नाराजी वाढत होती. या मार्गावर सर्वाधिक गर्दी होत असून गाड्यांच्या अभावी फेऱ्यांचे नियोजन विस्कळीत झाले होते.



आगार प्रमुख अमित बनसोडे यांनी प्रवासी संघटनांच्या शिफारशीवरून आमदार गर्जे यांच्याकडे वाढीव बस गाड्यांची मागणी केली होती. पाथर्डी तालुक्यात जिल्ह्यातील ग्रामीण भागात सर्वाधिक प्रवासी संख्या असून मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्राला जोडणारा हा महत्त्वाचा मार्ग ठरला आहे. बीडहून पुणे-मुंबईकडे जाण्यासाठी नवगण राजुरी, शिरूर, चिंचपूर मार्गे कमी अंतराचा व सुस्थितीत रस्ता असल्याने खाजगी वाहतूकही मोठ्या प्रमाणावर या मार्गे वळली आहे.

तसेच पंढरपूर, सोलापूर, संभाजीनगर, वैजापूर, अक्कलकोट, शेगाव, नांदेड तसेच तिसगाव मार्गे नाशिक या मार्गांवर नवीन फेऱ्या सुरू करण्यासाठीही बस गाड्यांची गरज होती. यापूर्वी तत्कालीन परिवहन मंत्री सुभाष ठाकरे यांच्याकडे पाठपुरावा करून आमदार गर्जे यांनी कोल्हापूरसाठी बस सेवा सुरू करून घेतली होती. ही गाडी आजही चांगले उत्पन्न देणारी ठरली आहे.

परिवहन मंत्र्यांनी एसटीच्या मध्यवर्ती कार्यालयासह कार्यकारी संचालकांना पाथर्डी आगारासाठी तातडीने बस उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले आहेत. यासंदर्भातील पत्र प्राप्त होताच आगारातील कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

मागील वर्षी आमदार मोनिका राजळे यांच्या प्रयत्नांतून १० नवीन बस गाड्या मिळाल्या होत्या. मात्र जुन्या गाड्यांपैकी सात गाड्या भंगारात गेल्याने पुन्हा टंचाई निर्माण झाली होती.

यावेळी आमदार गर्जे यांनी पाथर्डीच्या जुन्या बस स्थानकासाठी विशेष निधी देऊन अद्ययावत बस स्थानकासह व्यापारी संकुल उभारण्याची मागणीही परिवहन मंत्री व वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे केली.

अहिल्यानगरहून पाथर्डीकडे येण्यासाठी सायंकाळी ५ ते रात्री ९ या वेळेत बस उपलब्ध नसल्याने प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. या वेळेत विशेष नियोजन करून गाड्या सुरू कराव्यात, तसेच पुणे-पाथर्डी-पुणे मार्गावर उन्हाळी हंगामात बस फेऱ्यांची संख्या वाढवावी, अशी मागणी प्रवासी संघटनांनी केली आहे.

# संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या नऊ विद्यार्थ्यांना बिझिनेस नेक्स्ट कंपनीत नोकरी

● **कोपरगाव । वीरभूमी-**
संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या नऊ विद्यार्थ्यांची बिझिनेस नेक्स्ट कंपनीत नोकरीसाठी निवड झाली. या कंपनीने या सर्व विद्यार्थ्यांना आकर्षक पॅकेज देऊ केले. एआय आधारीत सॉफ्टवेअर सोल्युशन्स पुरविणारी ही कंपनी नोएडा येथील आहे. तिचे कार्यक्षेत्र युएसए, कॅनडा, सिंगापुर, अशा विविध ठिकाणी विस्तारलेले आहे. या सर्व विद्यार्थ्यांना अंतिम सत्राची परीक्षा अद्याप द्यायची आहे. त्यापूर्वीच त्यांच्या हाती नोकरीची आर्डर मिळाली. ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या उत्कृष्ट कामगिरीने संजीवनीचे विद्यार्थी नोकरीत कायम आघाडीवर असल्याचे वास्तव समोर येत आहे.

या विद्यार्थ्यांत कॉम्प्युटर इंजिनीअरिंगच्या अश्विनी नितिन मुंगसे, धनश्री जगदीश शहाणे, समृध्दी महेंद्र बोरावके, इन्फर्मेशन टेक्नॉलॉजीच्या अथर्व संजय भवर, शताक्षी सतिष भुसारी, हर्षल उमेश पाटील, प्रज्वल राजस सरोदे, श्रेयश चंद्रशेखर तळेकर व जयेश संजय थेटे यांचा समावेश आहे. संजीवनीच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग औद्योगिक जगतासोबत समन्वय ठेवतो. त्यानुसार विद्यार्थ्यांना अतिरिक्त प्रशिक्षण दिले जाते. विविध कंपन्यांचे उच्चपदस्थ अधिकारी येथे येऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. विविध नामांकित कंपन्यांना हव्या असलेल्या कुशल अभियंत्यांची जडणघडण संजीवनीत केली जाते. त्यामुळे परिक्षेपूर्वीच नोकरी हे समिकरण आकाराला आले आहे. ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे दरवर्षी मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये नोकऱ्यांच्या संधी उपलब्ध होत आहेत.

संजीवनीचे अध्यक्ष नितिनदादा कोल्हे व मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांनी सर्व निवड झालेले विद्यार्थी व त्यांचे पालक तसेच महाविद्यालयाचे डायरेक्टर डॉ. आर. ए. कापगते, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे डीन व त्यांची टीम यांचे अभिनंदन केले आहे.

> माझ्या भावाचे करिअर संजीवनीतच घडले. त्यामुळे मी निशंक मनाने संजीवनीत प्रवेश घेतला. आज माझे स्वप्न प्रत्यक्षात उतरले. चांगल्या कंपनीत चांगल्या पगारीची नोकरी परिक्षेच्या निकालापूर्वीच मिळाली. मला संजीवनीत 'स्मार्ट पाथहोल डिटेक्शन सिस्टिम युझिंग एआयएमएल' हा प्रोजेक्ट करण्याची संधी मिळाली. त्यामुळे एआयशी निगडीत असलेल्या या कंपनीत मला नोकरीची संधी मिळणे सोपे झाले. ट्रेनींग प्लेसमेंट विभागाने आम्हा सर्व विद्यार्थांवर खूप मेहनत घेतली. या सर्वांचा एकत्रीत परिणाम म्हणून आज आमच्या करिअरला चांगली सुरवात झाली.
>
> **- धनश्री शहाणे,** विद्यार्थिनी

# पीएमश्री जि. प. शाळेचे कामकाज आदर्श व कौतुकास्पद

## गटशिक्षणाधिकारी निलेश गुंड यांचे गौरवोद्गार । इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचे उत्सवी स्वागत

● **पाथर्डी । वीरभूमी-**
पाथर्डी येथील पीएमश्री जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेत नवीन शैक्षणिक धोरणानुसार इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेला 'प्रवेशोत्सव' उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाला उपस्थित असलेले नुतन गटशिक्षणाधिकारी निलेश गुंड यांनी शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचे व शैक्षणिक गुणवत्तेचे कौतुक करत, शाळेचे शैक्षणिक कामकाज आदर्श व कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्गार काढले.

नवीन शैक्षणिक धोरणानुसार शिक्षण हक्क अभियानाअंतर्गत वर्षाच्या प्रारंभी इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश घेणाऱ्या चिमुकल्यांचे स्वागत उत्सवी वातावरणात करण्यात आले. शाळेचे प्रांगण रांगोळ्या, फुगे, फुले तसेच प्रवेशोत्सवाच्या गुढीने सजविण्यात आले होते. नव्या विद्यार्थ्यांवर पुष्पवृष्टी करून त्यांचे स्वागत करण्यात आले. या अनोख्या स्वागतामुळे चिमुकली भारावून गेली असून त्यांच्या हसऱ्या चेहऱ्यांमुळे परिसर आनंदमय झाला होता.

यावेळी गटशिक्षणाधिकारी निलेश गुंड यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच पाथर्डी बीटचे विस्तार अधिकारी रामनाथ कराड, केंद्रप्रमुख सविता कुटे, ज्येष्ठ पत्रकार अविनाश मंत्री, अनिल खाटेर, अक्षय वायकर तसेच शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा जयश्री काळोखे आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आशीर्वाद दिले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्याध्यापिका नंदा तुपे यांनी



मान्यवरांचे स्वागत करून शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक व नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती दिली. शाळेतील सर्व शिक्षिका विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असून तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अध्यापन अधिक प्रभावी करण्यासाठी कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी गटशिक्षणाधिकारी गुंड यांनी शिक्षकांच्या कार्याचे कौतुक करत विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी त्यांना नवनवीन घडामोडींची माहिती देण्यावर भर द्यावा, तसेच शिक्षण क्षेत्रातील बदल स्वीकारून आधुनिक पद्धतीने अध्यापन करावे, अशा सूचना केल्या. शिक्षिका सुरेखा बडे, मनिषा फटांगरे, ज्योती जाधव, भावना देवरे, छाया चंदनशिव, मंदा पालवे, फुंदे मॅडम व किर्तने मॅडम यांनी कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले.

### नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे वाढतोय प्रवेश

■ जिल्हा परिषद शाळांमध्ये नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे. 'मिशन आरंभ' व 'कुसुमाग्रज वाचनालय' यांसारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड वाढत आहे. तसेच शिष्यवृत्ती परीक्षा व नवोदय विद्यालय प्रवेशासाठी मार्गदर्शन दिले जात आहे. पीएम श्री जि.प. शाळेत असे विविध उपक्रम यशस्वीपणे राबविले जात असल्याने इयत्ता पहिलीतील प्रवेशसंख्या वाढत असल्याचे गटशिक्षणाधिकारी निलेश गुंड यांनी सांगितले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

## निमगाव वाघात रविवारी श्री बिरोबा महाराज यात्रोत्सवाचे आयोजन

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**

निमगाव वाघा (ता. नगर) येथील ग्रामदैवत श्री बिरोबा महाराजांच्या यात्रा उत्सवानिमित्त रविवारी (दि.१२ एप्रिल) विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तर सोमवारी संध्याकाळी करिमशहा वली बाबांचा संदल-उरुस होणार आहे. सरपंच उज्वलाताई कापसे यांच्या नुकतेच झालेल्या अपघाती निधनाने बैलगाडा शर्यत व सांस्कृतिक कार्यक्रम रद्द करण्यात आले असून, गावामध्ये दुःखाचे सावट असल्याने दोन्ही उत्सव साध्या पध्दतीने होणार असल्याची माहिती ग्रामपंचायत सदस्य तथा सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे यांनी दिली. नुकतेच गावातील युवकांनी गंगाजल आणण्यासाठी बुधवारी (दि.८ एप्रिल) रात्री पारंपारिक वाद्यांसह मिरवणूकीने कावड घेऊन प्रवरा संगमकडे प्रस्थान केले. यावेळी श्री बिरोबा मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानात पै. नाना डोंगरे, देवाचे भगत नामदेव भुसारे, बाबा जाधव, बबन कापसे सहभागी झाले होते. गावातील युवकांचा जथ्था कावडी घेवून रविवारी यात्रेच्या दिवशी सकाळी ८ वा. गावात परतणार असून, कावडीची गावामधून डफ, ढोल, ताशे व लेझीम पथकासह मिरवणूक काढली जाणार आहे. सकाळी १० वाजता श्रीबिरोबा महाराजांच्या मूर्तीस गंगाजलाने अभिषेक घालून विधीवत पूजा केली जाणार आहे. सालाबाद प्रमाणे होणाऱ्या यात्रोत्सवानिमित्त मोठ्या संख्येने जिल्ह्यातील भाविक दर्शनासाठी येत असतात. रात्री ९ वाजता छबीना मिरवणूक काढली जाणार आहे. यात्रेनिमित्त गावातील बिरोबा मंदिराला रंगरंगोटी करुन, आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. यात्रेच्या दुसऱ्या दिवशी संध्याकाळी करिमशहा वली बाबांचा संदल-उरुस होणार आहे. गावातील यात्रा व संदल-उरुसच्या कार्यक्रमातून धार्मिक एकतेचे दर्शन घडणार आहे.

## शाळांची पटपडताळणी पुढे ढकलण्याची शिक्षक सेनेची मागणी

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

राज्यातील शाळांची पटपडताळणी प्रक्रिया पुढे ढकलावी अथवा पूर्णपणे रद्द करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक व शिक्षकेतर सेनेच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांनी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शालेय शिक्षण मंत्र्यांना निवेदन पाठवले आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, राज्यातील शाळांमध्ये दि. ११, १५ आणि २२ एप्रिल २०२६ रोजी पटपडताळणी आयोजित करण्यात आली आहे. मात्र, याच कालावधीत इयत्ता २री इयत्ता ९ वी व ११ वीच्या परीक्षा सुरू असून इतर शैक्षणिक उपक्रमही सुरू आहेत. त्यामुळे शाळांच्या नियमित शैक्षणिक कामकाजावर याचा प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. राज्यातील बहुतांश शाळांनी त्यांच्या परीक्षांचे वेळापत्रक आधीच निश्चित केले असून काही ठिकाणी पुढील इयत्तांसाठी जादा तासांचे नियोजनही करण्यात आले आहे. अशा परिस्थितीत अचानक येणाऱ्या पटपडताळणीमुळे शाळांच्या नियोजनात अडथळे निर्माण होत असल्याची बाब शिक्षक सेनेने स्पष्ट केले आहे. याशिवाय, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर सध्या विविध अशैक्षणिक जबाबदाऱ्यांचा ताण मोठ्या प्रमाणात आहे. यामध्ये बीएलओ म्हणून मतदार यादी अद्ययावत करणे, निवडणूक संबंधित कामे, टीइटी परीक्षा तयारी, जनगणना कामे, शासनाच्या विविध सर्वेक्षणांची अंमलबजावणी, तसेच ऑनलाईन नोंदी व माहिती भरणे अशा अनेक जबाबदाऱ्या समाविष्ट आहेत.

# शासनाच्या योजना थेट नागरिकांपर्यंत पोहोचवा

**आ. काशिनाथ दाते । चास येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरात' ८३८ लाभार्थ्यांना योजनांचा लाभ**

● **पारनेर । वीरभूमी–**



महसूल विभागाच्या माध्यमातून राज्यातील सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिलांच्या दैनंदिन प्रश्नांचे त्वरित निराकरण व्हावे तसेच प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान व्हावे, या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या 'श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान' अंतर्गत आज नगर तालुक्यातील चास येथे मंडलस्तरीय शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिराचे उद्घाटन पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते करण्यात आले. या उपक्रमाद्वारे तास मंडळातील ग्रामीण भागातील नागरिकांना रहिवासी, उत्पन्न व जातीचे दाखले, रेशन कार्ड वाटप, संजय गांधी निराधार योजना, पीएम किसान योजना यांसह विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यात आला. तसेच सात-बारा उतारे वाटप, प्रलंबित फेरफार नोंदींचे निराकरण आणि विविध योजनांसाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता यासंबंधी कामे तत्काळ करण्यात आली.

नागरिकांच्या सोयीसाठी महसूल विभागासह कृषी, पंचायत समिती, ग्रामपंचायत, आरोग्य, पशुसंवर्धन, समाजकल्याण, महिला व बालविकास, महावितरण, अन्न व नागरी पुरवठा, परिवहन (एस.टी.), शिक्षण आदी विविध विभागांचे स्वतंत्र स्टॉल उभारण्यात आले होते. त्यामुळे उपस्थित नागरिकांना त्यांच्या अडचणी मांडून तत्काळ मार्गदर्शन व सेवा मिळाली.

यावेळी बोलताना आमदार काशिनाथ दाते म्हणाले, शासनाच्या योजना कागदावर न राहता त्या थेट नागरिकांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत, हा या शिबिरामागचा मुख्य उद्देश आहे. सामान्य नागरिकांना त्यांच्या हक्काच्या सेवा वेळेत व सुलभ पद्धतीने मिळणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. अशा शिबिरांमुळे जनतेचा शासनावरचा विश्वास अधिक दृढ होतो आणि प्रशासन खऱ्या अर्थाने लोकाभिमुख बनते.

या कार्यक्रमास उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील, तहसीलदार संजय शिंदे, नायब तहसीलदार गौरव दळवी, शिवराज पवार, माजी सभापती रामदास भोर, सरपंच युवराज कार्ले, सरपंच सोनेवाडी विठ्ठलराव दळवी, युवा नेते सिद्धेश आंधळे, वैष्णव पठारे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, सेतू चालक, ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंडलाधिकारी रुपाली टेमक यांनी केले.

या शिबिरामुळे नागरिकांच्या अनेक प्रलंबित कामांना गती मिळाली असून प्रशासनाच्या लोकाभिमुख उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.


### शेत रस्त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी आ. दातेंचे मोठे योगदान

■ आज संपन्न झालेल्या या अभियानाच्या माध्यमातून विविध ९ योजनांअंतर्गत ८३८ लाभार्थ्यांना थेट लाभ देण्यात आला. या उपक्रमासाठी परिश्रम घेतलेल्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांनी आभार मानले. तहसील कार्यालयात येणाऱ्या सुमारे ५० टक्के तक्रारी या रस्त्यांशी संबंधित असून, जमीन विभाजनामुळे या समस्या अधिक वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर 'बळीराजा शेतपानंद रस्ते योजना' राबवून शेतजमिनीपर्यंत कायमस्वरूपी रस्ते सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या दळणवळणाच्या अडचणी मोठ्या प्रमाणात कमी होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## वारकरी संप्रदायाने हजारो वर्षांपूर्वीच जातीयवाद नष्ट केला : विजय महाराज

● **कोपरगाव । वीरभूमी–**

या जगात अनेक संप्रदाय आले आणि गेले. भविष्यात येतील आणि जातीलही पण वारकरी संप्रदाय अनादी आहे. आज आपण म्हणतो की जातिवाद नष्ट झाला पाहिजे परंतु काही हजारो वर्षांपूर्वी वारकरी संप्रदायाने खऱ्या अर्थाने जातीयवाद समूळ नष्ट केलेला आहे, असे प्रतिपादन हभप. विजय महाराज गुंजाळ यांनी केले आहे.



तालुक्यातील लौकी येथे अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने कीर्तन सेवेप्रसंगी ते बोलत होते. महाराजांनी यावेळी संतांचिया पायी हा माझा विश्वास हा संत तुकाराम महाराज यांचा अभंग निरूपणासाठी घेतला होता. या अभंगात संत तुकाराम महाराज सांगतात की, संतांच्या चरणी अढळ विश्वास ठेवून, सर्वभावाने त्यांचे दास झाल्यास जीवनातील सर्व कल्याण आपोआप साध्य होते. संत हेच खरे मार्गदर्शक असून ते भक्तांचे हित करतात. त्यांच्या कृपेनेचभगवंताची कृपा प्राप्त होते. संकटातही संतच आपल्याला आधार देतात. आपल्याला योग्य मार्गावर नेतात. संतांच्या सहवासामुळेच जीवनातील सर्व सुख प्राप्त होते. संतसेवा आणि त्यांच्यावरचा विश्वास कधीही ढळू नये हा संदेश दिला आहे. भगवान श्रीकृष्णाचे सेवा करणारे सर्व जाती धर्माचे भक्त होते. अलीकडच्या काळात जातीयवाद दिसुन येत आहे. परंतु सर्व धर्मांचा त्याग करून मला शरण् ये असे गीतेत सांगितले आहे. आपण सर्व मानव आहोत असे महाराजांनी यावेळी स्पष्ट केले.

यावेळी गायन साथ रोहित महाराज, शिवाजी महाराज, वसंत महाराज, तापकीरे महाराज, भरत महाराज आदींनी केली तर ज्ञानामृत व महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी परिसरातून मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

## जिल्हा परिषद चिंचपुर इजदे शाळेला खेडकर प्रतिष्ठानकडून वॉटर फिल्टरची भेट



● **पाथर्डी । वीरभूमी–**

ग्रामीण भागातील शाळांमध्ये आजही अनेक मूलभूत सुविधा अपुऱ्या आहेत. विद्यार्थ्यांना शुद्ध व थंड पाणी उपलब्ध व्हावे या उद्देशाने तालुक्यातील चिंचपूर इजदे येथील जिल्हा परिषद शाळेला बाळासाहेब साहेबराव खेडकर सर प्रतिष्ठानच्या वतीने वॉटर फिल्टर मशीनची भेट देण्यात आली.

यावेळी बोलताना जयश्री बाळासाहेब खेडकर म्हणाल्या की, मी या शाळेत बारा वर्षे सेवा केली असल्याने येथील अडीअडचणींची मला पूर्ण जाणीव आहे. विद्यार्थ्यांना शुद्ध पाणी मिळावे यासाठी हा छोटासा प्रयत्न केला आहे. ग्रामीण भागातील पालक व ग्रामस्थांनीही एकत्र येऊन आपल्या मुलांच्या उज्वल भविष्यासाठी जिल्हा परिषद शाळांना मुक्त हस्ताने मदत करावी.

या कार्यक्रमास मंगल साहेबराव खेडकर, डॉ. रामनाथ खेडकर, श्री भगवान महिला प्रतिष्ठानचे अध्यक्ष अजय फुंदे, अविनाश खेडकर, वृद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक त्रिंबक खेडकर, प्रसाद भिसे, विक्रम खेडकर, बाबासाहेब खेडकर, उद्धव खेडकर, विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन अनंत खेडकर, शिवनाथ मिसाळ तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जालिंदर खेडकर, सदस्य श्रीराम खेडकर, अंकुश सानप, रामदास त्रिंबक खेडकर आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका सुशिला बांगरे यांनी केले, तर गीता गाडेकर यांनी आभार मानले.

# भंडारदरा धरणातून आदिवासींना पाणी देण्यासाठी सर्वेक्षण सुरु

**किसान सभेच्या लढ्याला यश । लाँग मार्चमधील मागणीला प्रत्यक्ष गती**

● **अकोले । वीरभूमी–**

आदिवासी भागातील भंडारदरा धरणाच्या मागील बाजूकडील तसेच धरण भिंतीच्या पूर्वेकडील परिसरातील सर्व गावांना शासकीय योजनेतून पाणीपुरवठा करण्यासाठी सर्वेक्षणास मंजुरी देत आजपासून प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली. किसान सभा व संबंधित संघटनांच्या सातत्यपूर्ण लढ्याला हे मोठे यश मानले जात आहे.

लाँग मार्चमध्ये मान्य करण्यात आलेल्या मागण्यांच्या आढाव्यासाठी अकोले तहसील कार्यालयात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, किसान सभा व सीटू (उखढण) संलग्न विविध संघटनांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस जिल्ह्याचे अतिरिक्त जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर हे व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे उपस्थित होते. प्रांताधिकारी मुंडे तसेच तहसीलदार मोरे यांच्या उपस्थितीत विविध विभागांचे अधिकारीही सहभागी झाले होते.

लाँग मार्चदरम्यान भंडारदरा परिसरातील आदिवासी गावांना धरणाचे पाणी शासकीय योजनेतून देण्याची मागणी मान्य करण्यात आली होती. मंत्रालयस्तरावर त्यासंदर्भात आदेशही देण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर झालेल्या बैठकीत सर्वेक्षणास तातडीने सुरुवात करण्याचे आदेश पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्याची माहिती अतिरिक्त जिल्हाधिकारी कोळेकर यांनी दिली. जलसंपदा विभागाला आवश्यक निर्देश देण्यात आले असून प्राथमिक सर्वेक्षण पुढील आठवड्यात पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

भंडारदरा धरणाला १०० वर्षे पूर्ण होत असताना परिसरातील आदिवासी शेतकऱ्यांना शेती व पिण्यासाठी पाणी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

बैठकीत धरणामुळे जमीन गमावलेल्या शेतकऱ्यांना मोबदल्यात दिलेल्या जमिनी 'वर्ग-२' ऐवजी 'वर्ग-१' मध्ये रूपांतरित करून त्यांना मालकी हक्क देण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. तसेच अकोले तालुक्यातील घरतळ जमिनी शेतकऱ्यांच्या नावे करण्यासाठीची प्रकरणे, नव्या शासन निर्णयानुसार २०११ पूर्वीच्या प्रकरणांसाठी प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले.

वनजमिनीवरील हक्कांसाठी किसान सभेने सादर केलेल्या ९४८ प्रकरणांची प्रत्यक्ष पडताळणी तातडीने सुरू करण्याचेही यावेळी जाहीर करण्यात आले.



याशिवाय आशा कर्मचारी, शालेय पोषण आहार कर्मचारी, ग्रामरोजगार सेवक, बांधकाम कामगार यांच्या प्रश्नांवरही सविस्तर चर्चा करून त्यावर तोडगा काढण्याच्या दृष्टीने निर्णय घेण्यात आले.

जल जीवन मिशनअंतर्गत रतनवाडी व खडकी बुद्रुक येथील योजनांबाबत गंभीर तक्रारी मांडण्यात आल्या. तसेच आंबेवंगण येथील ग्रामस्थांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.

या बैठकीस डॉ. अजित नवले, सदाशिव साबळे, नामदेव भांगरे, गणेश ताजने, तुळशीराम कातोरे, हेमलता शेळके, संगीता साळवे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

वीरभूमी

# लोणी खुर्दमध्ये स्वच्छता व पर्यावरणासाठी अत्याधुनिक प्रकल्पांचे उद्घाटन

## १.४३ कोटींच्या पशुदाहिनी व सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पांमुळे परिसर होणार अधिक स्वच्छ, सुरक्षित व पर्यावरणपूरक

**● लोणी । वीरभूमी–**
राहाता तालुक्यातील लोणी खुर्द येथील चिकन-मटण मार्केट परिसरात स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाला चालना देणाऱ्या महत्त्वपूर्ण प्रकल्पांचे उद्घाटन भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले. सुमारे ५० लाख रुपये खर्चून उभारण्यात आलेली अत्याधुनिक पशुदाहिनी तसेच ९३ लाख रुपये खर्चाचा सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प अशा एकूण १ कोटी ४३ लाख रुपयांच्या या दोन प्रकल्पांमुळे परिसरातील स्वच्छता, आरोग्य व पर्यावरण व्यवस्थापन अधिक सक्षम होणार असल्याचे मत डॉ. विखे पाटील यांनी व्यक्त केले.

हा प्रकल्प जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली साकारण्यात आला आहे. विशेष म्हणजे, अहिल्यानगर जिल्ह्यातील हा अशा प्रकारचा पहिलाच प्रकल्प असून स्वच्छता व पर्यावरण व्यवस्थापनाच्या दृष्टीने तो एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

याप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर आबा गोंदकर, संचालक राहुल धावणे पाटील, संचालक दत्तात्रय गोरे पाटील, संचालक दिलीपराव गाडेकर, सचिव एस. मोटे तसेच व्यापारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ. विखे पाटील म्हणाले की, चिकन व मटण मार्केटमधील अवशेषांची शास्त्रोक्त व सुरक्षित पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी उभारण्यात आलेली ही पशुदाहिनी जिल्ह्यातील अशा प्रकारची पहिलीच अत्याधुनिक सुविधा आहे. या दाहिनीत टाकण्यात येणारे अवशेष पूर्णपणे जळून त्याची राख तयार होते. विशेष म्हणजे, या राखेचा पुढील काळात सेंद्रिय खत म्हणून उपयोग






केला जाणार असून पर्यावरणपूरक व्यवस्थापनाचा आदर्श निर्माण होणार आहे.

या प्रकल्पामुळे सांडपाण्याचे योग्य प्रकारे शुद्धीकरण होऊन परिसरातील स्वच्छता, आरोग्य व पर्यावरण संवर्धनाला मोठा हातभार लागणार असून स्थानिक नागरिकांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

कार्यक्रमादरम्यान स्थानिक व्यापाऱ्यांच्या वतीने डॉ. सुजय विखे पाटील यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांनी व्यापारी व ग्रामस्थांशी संवाद साधत स्वच्छता, पर्यावरण संरक्षण व आधुनिक सुविधा उभारणीसाठी शासन कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले. अशा



प्रकल्पांमुळे बाजारपेठ परिसर अधिक स्वच्छ, सुरक्षित व आरोग्यदायी राहण्यास मदत होणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

लोणी परिसरात राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे स्वच्छता व्यवस्थापन अधिक प्रभावी होण्यास मदत होणार असून पर्यावरणपूरक विकासाच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

# सेनापती बापट पतसंस्थेतील कर्जदार व संचालकांची मालमत्ता जप्ती व बँक खाती सील करा

## ठेवीदारांना न्याय देण्यासाठी शिवराय सामाजिक प्रतिष्ठानची मागणी

**● पारनेर । वीरभूमी –**
सेनापती बापट मल्टीस्टेट पतसंस्थेतील ठेवीदारांना न्याय मिळावा यासाठी थकीत कर्जदार तसेच अध्यक्ष रामदास भोसले, संचालक मंडळ व त्यांच्या नातेवाईकांच्या मालमत्ता जप्त करून बँक खाती सील करावीत, अशी मागणी शिवराय सामाजिक प्रतिष्ठान, महाराष्ट्र राज्यचे अध्यक्ष विनोद गोळे यांनी केली आहे. त्यांनी ही मागणी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे व आर्थिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे मांडली आहे.

पारनेरचे माजी आमदार व विधानसभा उपाध्यक्ष विजय भास्कर औटी यांनी स्थापन केलेल्या या पतसंस्थेचे अध्यक्ष रामदास भोसले असून, गेल्या दोन वर्षांपासून ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत मिळत नसल्याची तक्रार आहे. यामुळे ठेवीदारांनी न्यायालय, पोलीस ठाणे तसेच आंदोलनाच्या माध्यमातून न्याय



विनोद गोळे, शिवराय पतिष्ठाण

मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवले आहेत.

भाजीपाला विक्रेते, शेतमजूर ते नोकरदार अशा सर्वसामान्य नागरिकांचे सुमारे १०० ते १५० कोटी रुपयांचे ठेवी अडकल्या असल्याचे सांगण्यात येते. अनेक कर्जदारांनी मोठ्या प्रमाणावर कर्ज थकविले असून संचालक मंडळाविरोधातही कारवाईची मागणी होत आहे. संबंधित कर्जदार व संचालकांच्या स्थावर मालमत्ता जप्त करून त्यांच्या व नातेवाईकांच्या बँक खात्यांवर तातडीने निर्बंध आणावेत, अशी मागणी विनोद गोळे यांनी केली आहे.

### कर्जदाराच्या अटकेचे स्वागत

■ सेनापती बापट पतसंस्थेचा मोठा कर्जदार महेंद्र साईनाथ मंडलिक याला आर्थिक गुन्हे शाखेने अटक केली असून ही कारवाई स्वागतार्ह असल्याचे विनोद गोळे यांनी म्हटले आहे. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, पोलीस उपअधीक्षक गणेश उगले, पोलीस निरीक्षक शरद गोर्डे, सहाय्यक पोलीस निरीक्षक युवराज आठरे तसेच संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात येणार असून अशाच धाडसी कारवाया पुढेही सुरू ठेवाव्यात, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

# झगडे फाटा ते रांजणगाव देशमुख तालुका हद्द रस्त्यासाठी आ.आशुतोष काळेंनी मंजूर करून घेतलेल्या १७ कोटी निधीचा योग्य विनियोग व्हावा

**● कोपरगाव । वीरभूमी –**
राज्य मार्ग ६५ वरील झगडे फाटा ते रांजणगाव देशमुख (तालुका हद्द) रस्त्यासाठी आमदार आशुतोष काळे यांनी पुन्हा एकदा १७ कोटी निधी मंजूर करून घेतला आहे. त्यामुळे या निधीचा योग्य विनियोग झाला पाहिजे व रस्त्याच्या कामाची गुणवत्ता दर्जेदार असावी अशी मागणी पोहेगाव व पंचक्रोशीतील नागरीकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांच्याकडे केली.

आमदार आशुतोष काळेंच्या सूचनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी गुरुवार (दि.०९) रोजी पोहेगाव व पंचक्रोशीतील नागरीकांगाच्या समवेत झगडे फाटा ते रांजणगाव देशमुख (तालुका हद्द) रस्त्याची संयुक्तिक पाहणी केली यावेळी उपस्थित होते. या रस्त्याला यापूर्वीही आमदार आशुतोष काळे यांनीच १६.०५ कोटी निधी दिला होता. परंतु रस्त्याच्या मजबुतीकरणासाठी पाया भक्कम नसल्यामुळे हा रस्ता दुरुस्त होवूनही



बेसुमार अवजड वाहतुकीमुळे टिकू शकला नाही. त्यामुळे या मार्गावरची अवजड वाहतूक पाहता हा मार्ग सावळीविहीर फाटा ते कोपरगाव या रस्त्याच्या धर्तीवर सिमेंट कॉंक्रीट करण्याचा त्यांचा प्रयत्न असून त्यासाठी त्यांचा पाठपुरावा सुरु आहे व त्या पाठपुराव्याला यशही मिळणार असून या या रस्त्याची साडेसाती कायमची दूर होणार आहे. परंतु तोपर्यंत नागरीकांना होत असलेली खराब रस्त्याची अडचण दूर करण्यासाठी त्यांनी २०२६-२७ च्या अर्थसंकल्पामध्ये मतदारसंघातील महत्त्वाच्या रस्ते आणि पुलांच्या कामांचा समावेश करून २५ कोटी रुपयांचा भरीव निधी मंजूर करून घेतला असून त्यापैकी या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी पुन्हा एकदा १७ कोटी निधी मंजूर करून घेतला आहे. त्यामुळे या १७ कोटीच्या निधीचे अंदाजपत्रक तयार करतांना रस्त्याचे काम दर्जे दार कसे होईल असे अंदाज पत्रक तयार करावे अशा सूचना पोहेगाव व पंचक्रोशीतील नागरीकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांच्याकडे मांडल्या.

या सूचनांचा आदर करून सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपकार्यकारी अभियंता वर्षराज शिंदे यांनी रस्त्याचे काम दर्जेदार होईल या पद्धतीनेच अंदाजपत्रक तयार करण्याचे आश्वासित करून आमदार आशुतोष काळे यांच्या सूचनेनुसार आवश्यक ठिकाणी सी. डी. वर्क व योग्य उपाय योजना देखील करणार असल्याचे सांगितले. यावेळी काळे साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन प्रविण शिंदे, कोपरगाव एज्यूकेशन सोसायटीचे अध्यक्ष अशोकराव रोहमारे, संचालक शंकरराव चव्हाण, गंगाधर औताडे, सुनिल शिंदे, सचिन रोहमारे, बाजार समितीचे संचालक संजय शिंदे, शरदचंद्र पवार पतसंस्थेचे चेअरमन देवेन रोहमारे, गौतम बँकेचे संचालक बाबुराव थोरात, संतोष वर्पे, राजेंद्र औताडे, गजानन मते, शरद होन, संदिप थेटे, राजाभाऊ होन, दिपक रोहमारे, नंदकिशोर औताडे, राजेंद्र पाचोरे, संदिप रोहमारे, चांगदेव शिंदे, वाल्मिक नवले, वरुण रोहमारे, योगेश औताडे, राजेंद्र औताडे, जगदीप रोहमारे, रमेश औताडे, गोकुळ पाचोरे, कृष्णा औताडे, सुशिल औताडे, ज्ञानेश्वर गव्हाणे आदींसह सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, पोहेगाव व पंचक्रोशीतील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उंचखडक बुद्रुक जि. प. शाळेची झेप प्रेरणादायी; सर्वत्र अशाच शाळा व्हाव्यात

## डॉ. मैथिलीताई तांबे | शून्य पटसंख्येतून ७० पर्यंत प्रवास; नवोदय, सैनिक स्कूल निवड व विविध स्पर्धांत उल्लेखनीय यश

**● अकोले । वीरभूमी –**
गेल्या दोन वर्षांपूर्वी बंद पडलेली उंचखडक बुद्रुक येथील जिल्हा परिषद शाळा आज सामाजिक, आर्थिक, भौतिक व शैक्षणिक गुणवत्तेच्या दृष्टीने सर्वगुणसंपन्न बनली आहे. शून्य पटसंख्येतून ७० विद्यार्थ्यांपर्यंत झालेला प्रवास, 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' स्पर्धेत प्रथम क्रमांक, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासाठी निवड, आयएसओ मानांकन, तसेच पहिल्याच प्रयत्नात नवोदय विद्यालय व सैनिक स्कूलसाठी विद्यार्थ्यांची निवड, विज्ञान प्रदर्शन, शिष्यवृत्ती, सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धांतील यश अशी उल्लेखनीय कामगिरी या शाळेने केली आहे. उंचखडक बुद्रुकसारख्या जिल्हा परिषद शाळा सर्वत्र व्हाव्यात, असे प्रतिपादन संगमनेरच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा डॉ. मैथिलीताई तांबे यांनी केले.

त्या तालुक्यातील उंचखडक बुद्रुक येथील जिल्हा परिषद शाळेच्या गुणदर्शन सोहळ्यात बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर क्लास वन अधिकारी प्रा. अरुण भांगरे, रिपाइंचे राज्यसचिव विजय वाकचौरे, ज्येष्ठ पत्रकार भाऊसाहेब मंडलिक, रोटरी क्लबचे सहायक प्रांतपाल अमोल वैद्य, शिक्षणतज्ज्ञ भाऊसाहेब चासकर, कळसचे सरपंच राजेंद्र गवांदे, अमृत उद्योग समूहाचे जनसंपर्क अधिकारी नामदेव कहांडळ, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ॲड. सागर शिंदे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाऊमामा खरात होते.

यावेळी डॉ. तांबे म्हणाल्या की, शाळा सक्षमपणे चालविण्यासाठी मुख्याध्यापक, पालक, प्रशासन आणि प्रभावी शाळा व्यवस्थापन समिती हे चार महत्त्वाचे स्तंभ आवश्यक असतात. हे सर्व घटक उंचखडक बुद्रुक शाळेला लाभल्यामुळेच बंद पडलेली शाळा राज्य व देशाच्या पटलावर पोहोचली आहे. गाव लहान असले तरी पालकांनी शाळेवर विश्वास ठेवून आपल्या मुलांना जिल्हा परिषद शाळेत प्रवेश दिला, ही कौतुकास्पद बाब आहे.

याच शाळेचे तीन माजी विद्यार्थी अलीकडेच क्लास वन अधिकारी झाले असून त्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. इयत्ता पाचवीचा वर्ग नुकताच सुरू झाला असून त्यात २६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विशेष म्हणजे, अकोले तालुक्यातील काही अधिकाऱ्यांची मुलेही शहरातून या ग्रामीण शाळेत शिक्षणासाठी येत आहेत. सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांची नवोदय व सैनिक स्कूलसाठी पहिल्याच प्रयत्नात निवड होत असल्याने शाळेची गुणवत्ता अधोरेखित होते, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी प्रा. अरुण भांगरे, अभिजित देशमुख, सुरेश मंडलिक, श्रीकांत मंडलिक यांचा सत्कार करण्यात आला. तसेच नवोदय विद्यालयासाठी निवड झालेल्या स्वरा शिंदे व निशिता बोराडे, मिशन आरंभमधील पात्र विद्यार्थी सम्यक तपासे, सैनिक स्कूलसाठी निवड



झालेला सोहम खोकले यांच्यासह इतर विद्यार्थ्यांनाही सन्मानित करण्यात आले.

शाळेच्या उभारणीत मोलाचे योगदान देणारे शिक्षक रवि रुपवते, काळु तपासे, विक्रम गायकर, गोविंद खोकले तसेच केंद्रप्रमुख बडे यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अगस्ती कारखान्याचे माजी संचालक भाऊसाहेब खरात, भाऊसाहेब देशमुख, श्यामराव देशमुख, सागर देशमुख, तुषार देशमुख, अमोल शिंदे, विकास खरात, संदेश खरात, महेश खरात, महेश जेजुरकर, प्रतिक मंडलिक, अजय खरात, विशाल देशमुख, सोपानराव देशमुख, आबासाहेब मंडलिक, उपाध्यक्षा मनीषाताई देशमुख, श्रीमती घुले, श्रीमती क्षीरसागर, श्रीमती बडे, शितलताई देशमुख, हर्षदाताई देशमुख यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती क्षीरसागर व काळु तपासे यांनी केले, तर आभार भाऊसाहेब खरात यांनी मानले.